श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-७, अंक-८ | ऑगस्ट-२०१९ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८ |

## भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर जयंती उत्साहात साजरी

सोमवार, दि.२९ जूलै २०१९ रोजी भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर यांची ८९ वी जयंती प्रतिवर्षाप्रमाणे श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट, डेरवणच्या बहुउद्देशीय सभागृहात उत्साहाने साजरी झाली.

या कार्यक्रमाला श्री. विश्वनाथ मिराशी, पेन्ट टेक्नॉलॉजिस्ट, पुणे, हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. दीपप्रज्वलनानंतर इंग्लिश मिडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ईशस्तवन सादर केले. शिक्षिका जान्हवी चाळके यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. वालावलकर रुग्णालयाच्या वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचा सत्कार केला. सत्कारानंतर नर्सिंग कॉलेज व पॅरामेडीकल कोर्सेसच्या विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त करताना वालावलकर साहेबांच्या स्वभावाचे आणि चरित्राचे विविध पैलू उलगडले. इंग्लिश मिडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी, संस्कृत, जर्मन, स्पॅनिश भाषेत साहेबांबद्दलचे आपले मनोगत व्यक्त केले. सर्वच विद्यार्थ्यांनी येथील शिक्षण संकुलातील गुणवत्तापूर्ण शिक्षण व दर्जेदार सुविधांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.




*व्यासपीठावर - डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. विजय डोंबले, प्र. पाहुणे श्री. विश्वनाथ मिराशी, शरयू यशवंतराव आणि श्रीकांत पराडकर*




*प्रमुख पाहुण्यांचा सत्कार*

या नंतर संस्थेच्या शिक्षण संचालिका सौ. शरयू यशवंतराव आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या,''श्री. कमलाकरपंत वालावलकर साहेबांनी आपले सर्व ऐश्वर्य, आपले जीवनच श्रीसहजानंदसरस्वती महाराजांनी आरंभिलेल्या लोककल्याणकारी कामासाठी समर्पित केले. गुरुनिष्ठा, नम्रता, दानशूर वृत्ती, कर्तव्यनिष्ठा, परिश्रम, प्रामाणिकपणा, समाजसेवा या सद्गुणांचे साकार रूप म्हणजे कमलाकरपंत वालावलकर साहेब! साहेबांच्या दातृत्वातून स्थापन झालेल्या शैक्षणिक संस्थांमधून विद्यार्थी सुसंस्कार, ज्ञान, कौशल्य, आत्मविश्वासाची शिदोरी घेऊन विविध क्षेत्रांत यशस्वीरीत्या जबाबदारी पार पाडत आहेत. साहेबांच्या तपस्वी जीवनातून प्रेरणा घेऊन आपणही चांगले काम करून आपल्यातील सद्गुण सतत वृध्दिंगत केले पाहिजेत.''

''साहेब म्हणजे बावनकशी सोनं होते. सद्गुरुप्रेमाचा आणि श्रीकाकामहाराजांबद्दलचा आदराचा झरा साहेबांच्या हृदयात अखंड झुळझुळत होता म्हणूनच हे एवढे मोठे काम येथे उभे राहिले.




*इंग्लिश मिडियम शाळेच्या विद्यार्थ्यांचे मनोगत*

समाजासाठी उपयुक्त असे कार्य त्यांनी केले. श्रीकाकामहाराजांच्या अचूक मार्गदर्शनाखाली साहेबांचे सुपुत्र श्री. विकासराव वालावलकर हेसुद्धा आपल्या पित्याप्रमाणेच संस्थेचा सर्व भार सांभाळत आहेत. त्याच श्रद्धेने, निष्ठेने आणि प्रेमाने हे सद्गुरुकार्य ते करत आहेत म्हणूनच संस्थेचे नंदनवन झालेले दिसून येते. या कार्यात आपण सहभागी होऊन कार्य पुढे चालू ठेवूया!'' असे विचार डॉ. सुवर्णा पाटील यांनी व्यक्त केले.

श्री. वालावलकर साहेब यांच्या स्वप्नातील रुग्णालय व रुग्णालयातील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयींचा आवर्जून उल्लेख या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री विश्वनाथ मिराशी यांनी केला. आपल्या भाषणात ते म्हणाले, ''कांही वर्षांपूर्वी शिवसमर्थ गडापासून सुरुवात करून, रखरखीत वैराण माळ असलेल्या या भूमीवर आज जी भव्यदिव्य आस्थापने - सर्व सुविधांनी युक्त सुसज्ज रुग्णालय, विद्यालये, नर्सिंग कॉलेज, आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडासंकुल, आणि वैद्यकीय महाविद्यालय आणि तदनुषंगाने जरूर त्या सर्व सुविधा यांचे साम्राज्य आपल्याला उभे राहिलेले दिसते आहे ते वालावलकर साहेबांच्या लोककल्याणकारी परोपकारी दातृत्वातून निर्माण झाले आहे.




*पॅरामेडिकल कोर्सची विद्यार्थिनी स्वप्नाली किनारे बोलताना*

''आमच्या लहानपणी साहेबांच्या मोठेपणामुळे आम्ही मुले त्यांच्यापासून संकोचाने थोडी दूरच असायचो. पण एकदा असा प्रसंग झाला; श्रीबाबांच्या जयंती उत्सवासाठी त्यावेळच्या छोट्याशा मंदिराची साफसफाई आणि सजावट श्रीमहाराजांच्या मार्गदर्शनाखाली सर्व मुले मिळून करत असताना साहेब मुंबईहून आले. मंदिरात बऱ्याच वस्तु इतस्ततः पडलेल्या होत्या. साहेब आले म्हणून आम्ही त्या झटझट बाजूला करून त्यांना वाट करून दिली. साहेबांनी दर्शन घेतले आणि परतताना म्हणाले, ''मी पण येतो तुमच्याबरोबर काम करायला. चालेल ना? मला जमेल ना?'' त्यांच्या या प्रश्नाने ते आमच्या इतके जवळ झाले की तेव्हांपासून त्यांच्याबद्दलचा आदर वाढतच गेला तो आजतागायत!




*प्रमुख पाहुण्यांचे भाषण*

श्रीमहाराजांनी आरंभिलेल्या समाजोद्धाराच्या महान कार्याचे ते आधारस्तंभ होते. त्यांनी स्वतःसह आपल्या उत्पन्नाचा फार मोठा भाग श्रीमहाराजांना समर्पित केला होता. 'संतांचिये पायी हा माझा विश्वास । सर्व भावे दास झालो त्यांचा ।।' हे श्रीतुकाराममहाराजांचे वचन त्यांनी प्रत्यक्ष आचरणात आणले होते. 'तनु मन धना'ने महाराजांची सेवा त्यांनी केली.

''श्री महाराजांसारखा द्रष्टा आणि साहेबांसारखा महाराजांवर दृढ निष्ठा असलेला भक्त! महाराजांनी या स्थानाचे उत्थापन करण्याचे केलेले संकल्प साहेबांनी पूर्ण केले. तर आज त्याच्या होत असलेल्या विस्ताराचे आणि प्रगतीचे आपण सर्वजण साक्षीदार आहोत. पस्तीस वर्षांपूर्वी मुख्य रस्त्यापासून आत यायला धड रस्ता नव्हता. आज हा रस्ता दुतर्फा दुकाने, हॉटेल्स इत्यादींनी समृद्ध झालेला आपण पाहतो आहोत. श्रीमहाराजांच्या 'मागेल त्याला काम' या प्रणालीचा पाठपुरावा करतांना साहेबांनी निर्मिलेल्या या प्रकल्पांमधून वेगवेगळ्या स्तरातील हजारो जणांना काम मिळाले. यातून कित्येक कुटुंबे प्रस्थापित झाली. परिसराचा उत्कर्ष झाला, समाजाची सधनता वाढली. त्यांना शिक्षणाच्या सोयी, वेळेवर मिळणारे व परवडणारे योग्य औषधोपचार सहज आणि अगदी नजीक उपलब्ध होऊ लागले. हे सर्व घडले ते श्रीमहाराजांचे द्रष्टेपण, साहेबांची त्यांच्यावरील निष्ठा व अतुलनीय दातृत्व या समसमा सहयोगातून! साहेबांचे हे कार्य केवळ एकदाच केलेले काम नसून ते प्रदीर्घकाळ फल देणारा जणू कल्पवृक्ष आहे.

''श्रीमहाराजांना श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा एक अभंग अतिशय आवडायचा! 'मोगरा फुलला!' त्यातील 'इवलेसे रोप लावियले द्वारी।' या ओळीप्रमाणे महाराजांनी एक रोप साहेबांच्या अंतः-करणामधे लावले. तिथे ते केवळ रुजले नाही तर ज्ञानेश्वरमहाराजांनी म्हटल्याप्रमाणे 'तयाचा वेलू गेला गगनावेरी।' आज तो वेल फुलांनी छान बहरलाय, बहरतोय्. त्याचा सुगंध जगभर दरवळायला लागला आहे. या उन्मेषाचे साक्षी होण्याचे भाग्य आपल्याला लाभले आहे. केवळ साक्षी न राहाता आपण सर्वजण या कार्यामधे सहभागी होऊ या! आपल्या कुवतीनुसार आपण आपला खारीचा वाटा उचलून या कार्याला अजून उच्च शिखरावर नेण्याचा संकल्प आज साहेबांच्या जयंतिदिनी आपण सर्वजण करूया. साहेबांच्या या व्रतातील श्रद्धा, निष्ठा आणि दातृत्व काही अंश रूपाने जरी आपल्याकडे आले तरी आपल्या जन्माचे सार्थक झाल्यासारखे होईल.''

यानंतर शाळेच्या शिक्षिका जान्हवी चाळके यांनी अध्यक्षांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली.



*समारंभाला उपस्थित श्रोतृवर्ग*

# तिवरे धरण दुर्घटनाग्रस्तांना वालावलकर रुग्णालयाची मदत



*तिवरे धरण दुर्घटनाग्रस्तांना मदत करण्यासाठी पोहोचलेले वालावलकर रुग्णालयाचे आरोग्यपथक*

२० लाख घनमीटर पाणीधारणाक्षमता असणारे चिपळूण तालुक्यातील तिवरे धरण मंगळवार, दि. ३ जुलै २०१९ रोजी रात्री साडेनऊ वाजता फुटले आणि ओवळी, रिक्टोली, आकले, दादर, नांदिवसे, कळकवणे यासह सात गावांमध्ये पाणी घुसले. १४ वर्षांपूर्वी बांधले गेलेले हे धरण फुटल्यामुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली. पाण्याच्या लोंढ्याबरोबर वाहून गेल्यामुळे काही लोक मृत्युमुखी पडले. अनेक लोकांचे संसार वाहून गेले.

या दुर्घटनेविषयी समजताच, दुसऱ्या दिवशी सकाळी वालावलकर रुग्णालयाचे पथक मोबाइल वैद्यकीय युनिटसह आवश्यक औषधे आणि साहाय्यक यंत्रणा, डॉक्टर्स, परिचारिका, व हॉस्पिटलचे सामाजिक कार्यकर्ते यासह तातडीने घटनास्थळी पोहोचले. रुग्णालयाने ४ आणि ५ तारखेला दोन दिवस सातत्याने वैद्यकीय सेवा पुरविली. तसेच श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टतर्फे पूरग्रस्तांना माणशी दोन-दोन किलो तांदूळही मदत म्हणून देण्यात आले.



*श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टतर्फे दुर्घटनाग्रस्तांना माणशी दोन किलो तांदुळवाटप*



*पीडितांना वैद्यकीय मदत*

# २८ ते ३० जून या कालावधीत दुभंग ओठ आणि टाळू उपचार शिबिर

दुभंग ओठ आणि टाळू उपचाराबद्दल बऱ्याच जुन्या गैरसमजुती व अंधविश्वास आहेत. यातून रुग्णांना बाहेर काढण्यासाठी भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाने आजपर्यंत वेगवेगळ्या शिबिरांचे आयोजन केले आहे. २००५ सालापासून येथे 'दुभंग ओठ आणि टाळू उपचार' या प्रकल्पाला सुरूवात झाली. सुरुवातीच्या काळात 'स्माइल ट्रेन' अंतर्गत हा प्रकल्प राबविण्यात आला. नंतर हाच प्रकल्प भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाने स्वखर्चाने पुढे चालू ठेवला.

२०१७ साली "treatment for cleft lip and cleft palate" या प्रकल्पावर भ.क.ल. वालावलकर रुग्णालय व ABMSS (अखिल भारत महिला सेवा समाज), बंगलोर आणि DCKH (ड्यूश क्लेफ्ट किंडरहिलीफ), (German cleft children's aid society) यांनी बरोबर काम करण्यास सुरुवात केली. या सर्व शस्त्रक्रिया मोफत केल्या जातात. या प्रकल्पाचा फायदा रत्नागिरी जिल्ह्यातील रुग्णांनाच झाला नाही तर सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा जिल्हा आणि इतर अनेक ठिकाणच्या रुग्णांना झाला आहे. एका छताखाली रुग्णाला उपचारांच्या प्रोटोकॉलनुसार शस्त्रक्रिया आणि इतर दंत उपचार मिळू शकतात. दि. २८ ते ३० जून या काळात डॉ. निशीत अग्नी यांनी डेरवण रुग्णालयात शिबिर घेऊन सुमारे पन्नास मुलांची तपासणी केली. त्यातील दहा मुलांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. आणखी दहा मुलांवर पुढील शिबिरात शस्त्रक्रिया करण्यात येतील.

गेल्या १४ वर्षांपासून भ.क.ल.वालावलकर रुग्णालय या प्रकल्पसाठी उत्तम दर्जाची सेवा देत आहे व या प्रकल्पाअंतर्गत सुमारे १५० ते २०० लाभार्थीना फायदा झाला आहे. भ.क.ल.वालावलकर रुग्णालयामधील आधुनिक सुविधा ही ग्रामीण रुग्णांसाठी वरदान ठरली आहे.




*दुभंग ओठ आणि टाळू उपचार शिबिर- डॉ. निशीत अग्नी शिबिरात रुग्णतपासणी करताना*



*डॉ. निशीत अग्नी आणि त्यांचे सहकारी, रुग्ण आणि त्यांच्या पालकांसमवेत*

# दापोली येथे महिला मेळावा

दिनांक ४ जुलै २०१९ रोजी दापोली ग्रामपंचायत येथे खास महिलांसाठी सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत ग्रामीण आशा, एएनएम व जीएनएम परिचारिका, आंगणवाडी सेविका, स्थानिक डॉक्टर्स, पंचायत समिती अध्यक्ष व सभासद व इतर सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. या सभेला एकूण ८००-८५० लोक उपस्थित होते. डॉ. सुवर्णा पाटील यांनी सभेला संबोधित केले, रुग्णालयात उपलब्ध असलेल्या विविध सोयीसुविधांची व विविध योजनांची माहिती दिली. उपस्थित महिलांना स्त्रियांच्या आजारासंबंधित मार्गदर्शन केले आणि त्यासंबंधित प्रश्नांचे निरसन केले. त्याचबरोबर डेंग्यु, टायफॉईड आणि काविळ या सारख्या साथीच्या रोगांचा प्रतिबंध करण्याविषयी माहिती डॉ. रामबदन चौहान, प्रोफेसर, कम्युनिटी मेडिसिन डिपार्टमेंट, वालावलकर मेडिकल कॉलेज यांनी दिली.



*दापोलीतील महिला मेळाव्याला उत्साही प्रतिसाद*



*वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील दापोलीतील मेळाव्यात माहिती देताना*

# देवरूख ग्राम पंचायत येथे ग्रामसभेचे आयोजन

दि. २ जुलै २०१९ रोजी देवरूख ग्रामपंचायत येथे ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत ग्रामसभा सदस्य, स्थानिक गावकरी, ग्रामीण आशा, एएनएम परिचारिका उपस्थित होत्या. वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांच्या अध्यक्षेतेखाली भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाची कम्युनिटी टीमदेखील या सभेला उपस्थित होती. डॉ. सुवर्णा पाटील यांनी सभेला संबोधित केले, रुग्णालयात उपलब्ध असलेल्या विविध सोयीसुविधांची व विविध योजनांची माहिती दिली. त्यांनी जनतेच्या रुग्णालयासंबंधित प्रश्नांची उत्तरे दिली व त्यांच्या समस्यांचे निवारण केले.



*देवरुख येथील सभेला मोठ्या संख्येने उपस्थित ग्रामस्थ*



*पंचायत समिती देवरुखच्या सदस्यांबरोबर चर्चा करताना डॉ. सुवर्णा पाटील*

त्याचबरोबर भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाद्वारा चालविलेल्या विविध प्रकल्पांविषयी माहिती दिली गेली आणि त्यानुसार संगमेश्वर तालुक्यातील लाभार्थींसाठी वेळापत्रक तयार केले गेले आणि येत्या आठवड्यापासून ते अंमलात येणार आहे. या सभेला संगमेश्वर तालुक्याचे गट विकास अधिकारी सन्माननीय जाधवसाहेब, युयुत्सु आर्ते, सामाजिक कार्यकर्ता व जिल्हास्तरीय जलनायक जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासनद्वारा नियुक्त, उपस्थित होते. या सभेला एकूण २००-२५० लोक उपस्थित होते.

# जाता जाता... पण महत्त्वाचे...




*'एसव्हीजेसीटी' इंग्लिश मिडियम स्कूलची विजेती टीम (१७ वर्षांखालील) क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर यांच्यासमवेत*

दि. २५-२६ जुलै रोजी खेळल्या गेलेल्या सुब्रातो मुखर्जी फुटबॉल शालेय स्पर्धेच्या अंतिम फेरीत १४ वर्ष मुलांचा अंतिम सामना 'एसव्हीजेसीटी' इंग्लिश मिडियम स्कूल विरुद्ध ज्ञानदीप स्कूल, बडगाव यांच्यामध्ये होऊन हा सामना 'एसव्हीजेसीटी' इंग्लिश मिडियम स्कूलच्या खेळाडूंनी ३-० असा जिंकला. तसेच १७ वर्ष वयोगटातील मुलांचा सामना 'एसव्हीजेसीटी' इंग्लिश मिडियम स्कूल विरुद्ध अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय या संघात संपन्न झाला असून सदर सामन्यात देखील 'एसव्हीजेसीटी' इंग्लिश मिडियम स्कूलच्या खेळाडूंनी पेनल्टी शूट आऊट मध्ये बहारदार विजय नोंदविला. दोन्हीही विजेत्या संघांना 'एसव्हीजेसीटी' इंग्लिश मिडियम स्कूलचे क्रीडा शिक्षक मंगेश जाधव तसेच फुटबॉल प्रशिक्षक प्रसाद परांजपे यांचे मार्गदर्शन लाभले.

सदर स्पर्धेत रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण, दापोली, खेड, मंडणगड, रत्नागिरी येथील एकूण ३२ संघांनी आपला सहभाग नोंदविला होता.




*'एसव्हीजेसीटी' इंग्लिश मिडियम स्कूलची विजेती टीम (१४ वर्षांखालील) क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर यांच्यासमवेत*

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

## पुणे व मुंबई येथून ऑगस्ट २०१९ मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस.ऑर्थो.) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| १० ऑगस्ट | डॉ. संजय ओक, मुंबई (सर्जन) | लहान मुलांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया |
| ११ ऑगस्ट | डॉ. शिवप्रसाद दाते, मुंबई (सर्जन) | भाजलेले व्रण, डाग- शस्त्रक्रिया व उपचार |
| १७ ऑगस्ट | डॉ. आनंद जोशी, (गॅस्ट्रोएंट्रोलॉजीस्ट), मुंबई | पचनसंस्थेवरील तपासणी व उपचार |
| १७ ऑगस्ट | टाटा हॉस्पिटल डॉक्टर्स, मुंबई | कर्करोग शस्त्रक्रिया व उपचार |
| १७ ऑगस्ट | डॉ. श्रीपाद बाणावली, मुंबई (कर्करोग तज्ज्ञ) | कर्करोग तपासणी व उपचार |
| १७ ऑगस्ट | डॉ. सुजाता नाईक, मुंबई (होमिओपॅथीक)<br>सकाळी १०.०० ते १.०० वालावलकर रुग्णालयात.<br>सायंकाळी ५.०० ते ८.०० UHTC चिपळूण येथे | त्वचारोग तज्ज्ञ |
| १७ ऑगस्ट | डॉ. सचिन विलेकर, मुंबई (डायबेटीक तज्ज्ञ), | डायबेटीक फुट तपासणी व उपचार |
| १७ ऑगस्ट | डॉ. अनिरूध्द कुलकर्णी, मुंबई (रेडीऑलॉजीस्ट) | इंटरव्हेंशनल रेडीऑलॉजी तपासणी व उपचार |
| १७ ऑगस्ट | डॉ. भावेश पोपट, मुंबई (रेडीऑलॉजीस्ट) | इंटरव्हेंशनल रेडीऑलॉजी तपासणी व उपचार |
| १७ ऑगस्ट | श्रवण यंत्र व वाचा ऊच्चार तज्ञ | बहीरेपणाचे मशीन व स्पीच थेरपीस्ट |
| १८ ऑगस्ट | डॉ. वर्षा फडके, (पिडीयाट्रीक नेफ्रॉलॉजीस्ट), मुंबई | लहान मुलांचे किडनी आजार व उपचार |
| १८ ऑगस्ट . | डॉ. प्रीती इनामदार (पिडीयाट्रीक नेफ्रॉलॉजीस्ट), मुंबई | लहान मुलांचे किडनी आजार व उपचार |
| २५ ऑगस्ट | डॉ. के. एस. कुलकर्णी, पुणे (मानसोपचार तज्ज्ञ) | मानसोपचार |
| २५ ऑगस्ट | डॉ. अच्युत जोशी, पुणे (नेफ्रोलॉजिस्ट) | किडनी विकार |

**– डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व त्यानंतर वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.**

**– आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्णबधिरांना श्रवण यंत्र (कानाचे यंत्र) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी मोफत मिळेल. यासाठी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड व त्याची झेरॉक्स आणणे आवश्यक आहे.**

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. । Visit us at https://swamisamarth.com/dervan/
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०